ePaper

## सकाळी सुनेत्रा पवार भेटल्या; सायंकाळी शरद पवारांकडून सुप्रिया सुळेंची उमेदवारी जाहीर!



| वर्ष - 7 | अंक - 293 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | रविवार, दिनांक 10 मार्च 2024 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

### आतील पानांत


- इंग्रजाचा तीन दिवसात खेळ खल्लास!
- मीरा लग्नबंधनात अडकणार !
- नमाज पढणाऱ्यांना हाकललं
- हल्ली कोण कुठंय हेच कळत नाही


## राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची माहिती

# सांडपाणी सिंचन वापरासाठी प्रोत्साहन!

## पिंपरी-चिंचवडमधील विविध प्रकल्पांचे भूमिपूजन व लोकार्पण

| पिंपरी | महाईन्यूज

**राज्यात सांडपाणी व मैला- रसायनमिश्रीत दुषित पाणी अत्याधुनिक पद्धतीने प्रक्रिया करुन सिंचनासाठी देण्यासाठी प्रोत्साहन देण्यात येणार आहे. नागपूरच्या धर्तीवर मोशी कचरा डेपोवरील लिगसी वेस्टला 'वेल्थ'मध्ये परावर्तीत करण्यासाठी पुढाकार घेणार आहोत. बायोमायनिंगच्या माध्यमातून कचराच्छादित जमीन मोकळी केली जाणार आहे. नदी-नाल्यांचे प्रदूषण रोखण्यासाठी सांडपाणी स्वच्छ करण्याचा प्रयत्न आहे. सांडपाणी थेटपणे नदीत सोडता येणार नाही, असे सरकारचे धोरण आहे, असे मत राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केले.**



पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या वतीने चिखली येथील आरक्षण क्र. १/१६ येथे उभारण्यात आलेल्या नवीन टाऊन हॉलसह तब्बल १ हजार ५० कोटी रुपयांहून अधिक खर्चाची विविध विकासकामांचे लोकार्पण आणि भूमिपूजन ऑनलाईन पद्धतीने करण्यात आले. यावेळी फडणवीस बोलत होते.

यावेळी खासदार श्रीरंग बारणे, आमदार महेश लांडगे, आमदार अश्विनी जगताप, आमदार अण्णा बनसोडे, शहराध्यक्ष शंकर जगताप, पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे, महापालिका आयुक्त आयुक्त शेखर सिंह, माजी नगरसेवक, पदाधिकारी व महापालिका अधिकारी आदी उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा चिखली ग्रामस्थ व संतपीठा प्रशासनाच्या वतीने तुकोबांची पगडी, मृदंग देवून सन्मान करण्यात आला.

देवेंद्र फडणवीस म्हणाले की, महिलांच्या हातांना काम देण्यासाठी देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शक्ती वंदना उपक्रम हाती घेतला. याद्वारे अर्थचक्रामध्ये महिलांचे योगदान घेण्याचा प्रयत्न केला. यासह कौशल्य विकास महत्त्वाचे असून, त्यामुळे रोजगार निर्मितीला मदत होणार आहे. शिक्षण, आरोग्य आणि रोजगारसोबत मनोरंजन-प्रबोधनासाठी सिटी सेंटर उपयोगी ठरेल. शहर चांगले करायचे असेल, तर रस्ते, पाणी आणि अन्य पायाभूत सोयी-सुविधा प्रकल्पांना प्राधान्य दिले जात आहे. प्रशासन आणि लोकप्रतिनिधी दोन्ही चाकांनी चांगले काम करीत प्रकल्पांना गती देण्याचे काम केले आहे.

तसेच, पिंपरी-चिंचवड शहराची ओळख पुण्याच्या छायेतील शहर असे न राहता. आंतरराष्ट्रीय पातळीवर शहराची स्वतंत्र ओळख निर्माण होण्यासाठी ६ हजारच काय? आणखी हजारो कोटी रुपयांची कामे आमदार महेश लांडगे घेवून आले, तरी आम्ही ती करणार आहोत, असा विश्वासही फडणवीस यांनी दिला.

आभार प्रदर्शन अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे-पाटील यांनी केले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

### विविध विकासकामांना गती : आयुक्त शेखर सिंह

» आयुक्त शेखर सिंह म्हणाले की, पिंपरी-चिंचवडमध्ये सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प, मैलाशुद्धीकरण प्रकल्प, चिखली टाऊन हॉलचे उद्घाटन, महिला बचत गट सक्षमीकरण 'सक्षमा' प्रकल्प, रोजगार व प्रशिक्षणाच्या 'कौशल्यम' प्रकल्प, नवी दिशा प्रकल्प, १७.९ टन प्रतिदिन क्षमतेच्या जैव वैद्यकीय घनकचरा विल्हेवाट प्रकल्प, राष्ट्रीय स्वच्छ हवा कार्यक्रम NCAP अंतर्गत प्रकल्प, प्रभाग क्र. ७ भोसरी गावठाणातील स.नं. १ मध्ये कबड्डी प्रशिक्षण केंद्र विकसित करणे, तसेच अनुषंगिक कामाचे उद्घाटन केंद्र शासनाच्या प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत पिंपरी-चिंचवड मनपा क्षेत्रात आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांसाठी चऱ्होली येथील निवासी सदनिकांचे लोकार्पण निगडी येथील जय ट्रेडर्स समोर पादचारी भुयारी मार्गाचे लोकार्पण करण्यात येत आहे, असे सांगितले.

### 'नटसम्राट' कोण हे जनता जाणते...



»संत तुकाराम महाराज यांच्या नावाने सुरू होत असलेले नाट्यगृह सुरू होत आहे. या माध्यमातून चांगले व्यासपीठ निर्माण झाले आहे. ही जगद् गुरू तुकाराम महाराज यांना दिलेली वंदना आहे. पण, सध्या राज्यात नाट्यगृहाबाहेरील नाटकांची चर्चा अधिक आहे. "गाढवाचे अंगीं चंदनाची उटी । राखेसवे भेटी केली तेणें ॥" या जगद् गुरू संत तुकाराम महाराज यांच्या अभंगाप्रमाणे राज्याच्या राजकारणात कोण अंगाला राख लावून घेत आहे, हे लोकांना माहिती आहे. मनातील कथा कथाकथन करीत आहे. संशयकल्लोळ सुरू आहे. आमचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी डंपर पलटी केलाच आहे, असा टोला उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विरोधकांना लगावला आहे.

### शहराच्या विकासात फडणवीसांचे योगदान : आमदार महेश लांडगे



»आमदार महेश लांडगे म्हणाले की, २०१७ पासून २०२२ पर्यंत आणि आता महायुतीच्या काळात सुमारे ५ हजार कोटी रुपयांची कामे या परिसरात झाली आहेत. त्याचे श्रेय सर्वपक्षीय नगरसेवक, लोकप्रतिनिधी आणि प्रशासनालाही जाते. सर्व भूमिपुत्रांनी आपल्या जमिनी दिल्या म्हणून विकासकामे झाली. त्यांचे खऱ्या अर्थाने आभार मानले पाहिजेत. देवेंद्र फडणवीस यांच्या सहकार्यामुळेच सर्व विकासप्रकल्प मार्गी लागले. मोशी कचरा डेपोवरील कचऱ्याचे डोंगर कमी करण्यासाठी वेस्ट टू एजर्नी, बायोमायनिंग, सीएनडी वेस्ट, बायोगॅस निर्मिती असे अनेक प्रकल्प निर्माण झाले. 'फ्युचर सिटी' पिंपरी-चिंचवड असा उल्लेख करीत फडणवीस यांनी शहराच्या विकासाला चालना दिली. स्वतंत्र पोलीस आयुक्तालय, आंद्रा, भामा आसखेड प्रकल्प, वीज वितरणासाठी उपकेंद्र आणि विविध ४०० कोटी रुपयांची कामे हाती घेण्यात आली आहेत. महाराष्ट्रातील पहिले संतपीठ, २००८ पासून शास्तीकर पूर्णपणे माफी करण्यासाठी फडणवीस यांनी पुढाकार घेतला. शास्तीकर माफी, उपयोगकर्ता शुल्क रद्द करताना किंवा विकासकामे करताना उपमुख्यमंत्री फडणवीस यांनीही कोणताही जात-धर्म किंवा पक्षीय भेदभाव केला नाही, असे गौरोद्गारही लांडगे यांनी काढले. धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या जगातील सर्वात मोठ्या स्मारकासाठी फडणवीस यांच्या पुढाकाराने जागा मिळाली, असेही लांडगे यांनी सांगितले.

# पीएमपीच्या ताफ्यात लवकरच 500 गाड्या!

## » विजेवर धावणाऱ्या गाड्यांची खरेदी करण्यात येणार

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पुणे आणि पिंपरी-चिंचवड शहराची प्रमुख सार्वजनिक सेवा असलेल्या पीएमपीसाठी महापालिकेकडून विजेवर धावणाऱ्या ५०० गाड्यांची खरेदी करण्यात येणार आहे. त्यामुळे पीएमपीच्या ताफ्यातील गाड्यांची संख्या वाढणार असून प्रवाशांना जलद सेवा मिळण्यास मदत होणार आहे. पुणे आणि पिंपरी-चिंचवड शहरातील किमान १० लाख प्रवाशांची पीएमपी ही प्रमुख सार्वजनिक सेवा आहे. त्या तुलनेत पीएमपीच्या ताफ्यातील गाड्यांची संख्या अपुरी आहे.**




त्यामुळे ताफ्यातील गाड्यांची संख्या वाढविण्याची मागणी सातत्याने स्वयंसेवी संस्था, प्रवासी संस्थांकडून होत होती. ही बाब लक्षात घेऊन पुढील वर्षभरात नव्याने ५०० गाड्या खरेदी करण्याचे नियोजन महापालिकेने केले आहे.पीएमपी प्रशासनाने गेल्या काही महिन्यांत काही गाड्यांची खरेदी करण्याचा निर्णय घेतला होता. त्याबाबतचा प्रस्ताव संचालक मंडळाच्या बैठकीतही मंजूर झाला असून, गाड्या खरेदीची प्रक्रिया प्रशासनाकडून सुरू करण्यात आली आहे. येत्या काही दिवसांत त्या संदर्भातील निविदा प्रक्रिया प्रसिद्ध होणार असून, १७७ गाड्यांची खरेदी पहिल्या टप्प्यात करण्यात येणार आहे. पीएमपीच्या ताफ्यात सध्या विजेवर धावणाऱ्या ४७३ गाड्या आहेत. येत्या काही दिवसांत १७७ गाड्या दाखल होणार असून त्यामुळे ही संख्या ६५० एवढी होणार आहे. त्यामध्ये नव्याने घोषणा केल्याप्रमाणे ५०० गाड्यांची भर पडणार आहे. प्रस्तावित ५०० गाड्यांमध्ये १०० गाड्या विजेवर धावणाऱ्या, तर ४०० गाड्या सीएनजीवरील असतील, असे महापालिका आयुक्त, प्रशासक विक्रम कुमार यांनी स्पष्ट केले.रस्ते विकसनाबरोबरच सार्वजनिक वाहतुकीच्या सक्षमीकरणालाही महापालिकेने प्राधान्य दिले आहे. पीएमपीसाठी एकूण ४८२ कोटी रुपये मंजूर करण्यात आले आहेत. तसेच पीएमपीच्या सुतारवाडी आणि निगडी या आगारांमध्ये 'बांधा-वापरा आणि हस्तांतरीत करा' या तत्त्वावर आगारांचे व्यापारी विकसन करण्यात येणार आहे. त्यातून पीएमपीला उत्पन्न मिळण्यास मदत होणार आहे. तसेच विविध आगारांमध्ये आणि पीएमपीच्या स्वमालकीच्या मिळकतींवर ई-चार्जिंग स्टेशनही उभारण्याचे नियोजित आहे.चार्जिंगचीही सुविधा पुरेशा प्रमाणात उपलब्ध होणार आहे.त्यामुळे ताफ्यातील गाड्यांची संख्या वाढविण्याची मागणी सातत्याने स्वयंसेवी संस्था, प्रवासी संस्थांकडून होत होती. ही बाब लक्षात घेऊन पुढील वर्षभरात नव्याने ५०० गाड्या खरेदी करण्याचे नियोजन महापालिकेने केले आहे.

### उत्पन्न मिळण्यास मदत होणार

» पीएमपी प्रशासनाने गेल्या काही महिन्यांत काही गाड्यांची खरेदी करण्याचा निर्णय घेतला होता. त्याबाबतचा प्रस्ताव संचालक मंडळाच्या बैठकीतही मंजूर झाला असून, गाड्या खरेदीची प्रक्रिया प्रशासनाकडून सुरू करण्यात आली आहे. येत्या काही दिवसांत त्या संदर्भातील निविदा प्रक्रिया प्रसिद्ध होणार असून, १७७ गाड्यांची खरेदी पहिल्या टप्प्यात करण्यात येणार आहे. पीएमपीच्या ताफ्यात सध्या विजेवर धावणाऱ्या ४७३ गाड्या आहेत. येत्या काही दिवसांत १७७ गाड्या दाखल होणार असून त्यामुळे ही संख्या ६५० एवढी होणार आहे. त्यामध्ये नव्याने घोषणा केल्याप्रमाणे ५०० गाड्यांची भर पडणार आहे. प्रस्तावित ५०० गाड्यांमध्ये १०० गाड्या विजेवर धावणाऱ्या, तर ४०० गाड्या सीएनजीवरील असतील, असे महापालिका आयुक्त, प्रशासक विक्रम कुमार यांनी स्पष्ट केले.रस्ते विकसनाबरोबरच सार्वजनिक वाहतुकीच्या सक्षमीकरणालाही महापालिकेने प्राधान्य दिले आहे. पीएमपीसाठी एकूण ४८२ कोटी रुपये मंजूर करण्यात आले आहेत. तसेच पीएमपीच्या सुतारवाडी आणि निगडी या आगारांमध्ये 'बांधा-वापरा आणि हस्तांतरीत करा' या तत्त्वावर आगारांचे व्यापारी विकसन करण्यात येणार आहे. त्यातून पीएमपीला उत्पन्न मिळण्यास मदत होणार आहे.

# गेल्या वर्षाच्या तुलनेत कांदा उत्पादनात ४७ लाख टनांनी घट?

## » प्रवासी वाहतूक क्षेत्रात कार्यरत कंपन्यांकडून विनापरवाना व्यवसाय सुरू

।पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**केंद्रीय कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्रालयाने २०२३-२४ मध्ये कांदा उत्पादनात गेल्या वर्षाच्या तुलनेत ४७.३५ लाख टनांनी घट होऊन २५४.७३ लाख टन कांदा उत्पादनाचा अंदाज व्यक्त केला आहे. त्यामुळे कांदा निर्यातीवरील निर्बंध उठण्याची शक्यता धूसर झाली आहे.**

शेतकरी कल्याण मंत्रालयाने २०२३-२४ या वर्षासाठी फलोत्पादनाचा पहिला अंदाज जाहीर केला. त्यानुसार यंदा देशात सुमारे २५४.७३ लाख टन कांदा उत्पादनाचा अंदाज आहे.सन २०२२-२३मध्ये देशात ३०२.०८ लाख टन कांदा उत्पादन झाले होते. गेल्या वर्षीच्या तुलनेत महाराष्ट्रात ३४.३१ लाख टन, कर्नाटकात ९.९५ लाख टन आणि आंध्र प्रदेशात ३.५४ लाख टन आणि राजस्थानात ३.१२ लाख टनांनी उत्पादनात घट होण्याचा अंदाज आहे. गेल्या वर्षाच्या तुलनेत कांदा उत्पादनात यंदा ४७.३५ लाख टनांनी घट होण्याचा अंदाज आहे. टोमॅटो उत्पादनात गेल्या वर्षाच्या तुलनेत १.९३ टक्क्यांनी वाढ होऊन एकूण उत्पादन २०८.१९ लाख टनांवर जाण्याचा अंदाज आहे.

गेल्या वर्षा २०४.२५ लाख टन टोमॅटो उत्पादन झाले होते. देशात यंदा ५८९.९४ लाख टन बटाटा उत्पादनाचा अंदाज आहे. गेल्या वर्षी ६०१.४२ लाख टन बटाटा उत्पादन झाले होते. गेल्या वर्षाच्या तुलनेत यंदा ११.४८ लाख टनांनी घट होण्याचा अंदाज आहे. कांदा, टोमॅटो आणि बटाटा, ही मुख्य भाजीपाला उत्पादने आहेत. सर्वसामान्यांच्या आहारातील मुख्य घटक असल्यामुळे पुरेशी उपलब्धता आणि दर नियंत्रणात ठेवण्यासाठी केंद्र सरकार या पिकांच्या उत्पादनावर लक्ष ठेवून असते.यंदा देशात एकूण फलोत्पादन (पालेभाज्या, फळभाज्या आणि फळे) ३५५२.५ लाख टनांवर जाण्याचा अंदाज आहे. गेल्या वर्षी भाजीपाला लागवड २८४.४ लाख हेक्टरवर होऊन ३५५४.८ लाख टन उत्पादन झाले होते. यंदा २८७.७ लाख हेक्टरवर लागवड होऊन ३५५२.५ लाख टन उत्पादन होण्याचा अंदाज आहे. भाजीपाल्यामध्ये पत्ताकोबी, फूलकोबी, टोमॅटोसह अन्य भाजीपाल्याच्या उत्पादनात वाढ होण्याचा अंदाज आहे. केळी, मोसंबी आणि आंब्याच्या उत्पादनात वाढ होऊन एकूण फळ उत्पादन ११२०.८ लाख टनांवर जाण्याचा अंदाज आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत महाराष्ट्रात ३४.३१ लाख टन, कर्नाटकात ९.९५ लाख टन आणि आंध्र प्रदेशात ३.५४ लाख टन आणि राजस्थानात ३.१२ लाख टनांनी उत्पादनात घट होण्याचा अंदाज आहेकांदा उत्पादनात यंदा ४७.३५ लाख टनांनी घट होण्याचा अंदाज आहे. टोमॅटो उत्पादनात गेल्या वर्षाच्या तुलनेत १.९३ टक्क्यांनी वाढ होऊन एकूण उत्पादन २०८.१९ लाख टनांवर जाण्याचा अंदाज आहे.



### एकरी उत्पादनात लक्षणीय वाढ

» पीकवर्ष २०२३-२४ मधील (जुलै-जून) फलोत्पादनाच्या पहिल्या अंदाजात कांदा पिकाखालील क्षेत्र व उत्पादकता गृहीत धरली आहे. त्यात पुढील अनुमानात वाढ होऊ शकते. रब्बीत महाराष्ट्रात क्षेत्र कमी असले, तरी एकरी कांदा उत्पादकता यंदा लक्षणीयरीत्या सुधारली आहे. एकूण देशांतर्गत उत्पादनात रब्बीचा वाटा ७० टक्क्यांहून अधिक आहे, तर महाराष्ट्राचा वाटा ५० टक्क्यांपर्यंत येतो. रब्बी कांद्याची काढणी अद्याप बाकी असल्यामुळे मे अखेरीस कांदा उत्पादनाची स्थिती अधिक स्पष्ट होईल, असे मत शेती अभ्यासक दीपक चव्हाण यांनी व्यक्त केले. केंद्रीय कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्रालयाने २०२३-२४ या वर्षासाठी फलोत्पादनाचा पहिला अंदाज जाहीर केला.

## आमदार सुनील शेळकेंना दिलेला दम पथ्यावर

# वाघेरेंना खासदार पवारांची ‘पॉवर’!

### मावळात वातावरण तापले : दिग्गजांचा संजोग वाघेरेंना पाठिंबा

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**“दमदाटी कराल तर गाठ माझ्याशी आहे... माझे नाव शरद पवार आहे... “ असल्याचे सांगून खासदार शरद पवार यांनी मावळ विधानसभेचे आमदार सुनील शेळके यांना गर्भित इशारा दिला आहे. खासदार पवार यांचे हे आक्रमक रूप लोणावळा येथील कार्यक्रमात पाहायला मिळाले. लोणावळा शहराचा मावळ लोकसभा मतदारसंघात समावेश होत आहे. त्यामुळे विरोधकांना खासदार पवार यांनी दिलेला हा इशारा विशेषतः मावळ लोकसभेसाठी महाविकास आघाडीतील शिवसेनेचे उमेदवार असलेल्या संजोग वाघेरे यांच्या पथ्यावर पडणार आहे. मावळमधून उपमुख्यमंत्री अजित पवार समर्थकांची आता राजकीय कोंडी झाली असून इथून महाविकास आघाडी आघाडीवर राहण्याची शक्यता आता राजकीय जाणकार व्यक्त करत आहेत.**



महायुतीमध्ये जागा वाटपावरून गोंधळ असल्याचे पाहायला मिळत आहे. मावळ लोकसभेत उपमुख्यमंत्री अजित पवार यांची ताकद आहे. पूर्वीपासून हा मतदारसंघ राष्ट्रवादीच्या वाट्याला असल्याचे सांगून या वेळीही अजित दादांच्या राष्ट्रवादीने या मतदारसंघावर आपला दावा केला आहे. या मध्ये मोठ्या प्रमाणात मावळचे आमदार सुनील शेळके अग्रभागी राहिले आहेत. शेळके यांनी सुरुवातीपासूनच आक्रमक भूमिका घेत मावळ लोकसभेची खिंड लढवण्यासाठी प्रयत्न केला. विरोधकांना थेट अंगावर घेतले. परिणामी अजित पवार यांचा पक्ष या भागात मुसंडी मारेल अशा चर्चा रंगल्या होत्या. मात्र शेळके यांनी थेट खासदार पवार यांच्या सभेला जाण्यावरून धमकावल्याच्या चर्चा रंगल्या आणि थोरल्या पवारांच्या रोषाला सामोरे जावे लागले. मावळ मध्ये अजित दादांना रोखायचे असेल तर त्यांच्या समर्थकांना धाकात ठेवण्याची किमया खासदार पवारांनी केली. माझ्या वाट्याला आला तर सोडणार नाही म्हणत आमदार शेळके यांच्यासह मावळ लोकसभेतील विरोधकांनाच जणू हा संदेश दिल्याचे बोलले जात आहे. लोणावळ्यातील भाषणाचा समारोप करताना खासदार पवार यांनी महाविकास आघाडीच्या उमेदवारांना निवडून द्या अशी घातलेली हाक शिवसेनेच्या संजोग वाघेरे यांच्या फायद्याचे ठरणार असल्याची चर्चा आहे.

लोणावळ्यातील सभेत संजोग वाघेरे यांची देखील उपस्थिती होती. वाघेरे यांचे वडील भिकू वाघेरे खासदार शरद पवारांचे निष्ठावान होते. सध्याचे राजकीय गणित पाहून संजोग वाघेरे यांनी राष्ट्रवादीचे घड्याळ सोडून शिवबंधन हातात बांधले. पक्षफुटीनंतर उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या मांडीला मांडी लावून बसण्याऐवजी शिवसेनेचा निवडलेला मार्ग खासदार पवारांना देखील अडथळ्यांचा वाटला नाही. त्यामुळे वाघेरे यांच्याविषयी खासदार पवारांनी सॉफ्ट कॉर्नर घेतल्याचे पाहायला मिळाले. त्यामुळेच महाविकास आघाडीच्या उमेदवाराला निवडून द्या या शरद पवारांच्या आवाहनाचा वाघेरे यांना फायदा होणार आहे. चिंचवड, पिंपरी, मावळ लोकसभेत शरद पवारांना मानणारा जुन्या कार्यकर्त्यांचा मोठा गट आजही सक्रिय आहे. पवारांनी आवाहन केल्यावर हा गट क्रियाशील होईल याची भीती विरोधकांना आहे. त्यामुळेच ते पवारांची थेट नाराजी घेत नसल्याचे दिसते. तर दुसरीकडे घाटाखाली उरण, पनवेल आणि कर्जत विधानसभेत शेतकरी कामगार पक्षाची मोठी ताकद आहे. शेकापचे नेतृत्व शरद पवारांच्या शब्दच प्रमाण माननारे आहेत. त्यामुळे आगामी लोकसभेत सर्व राजकीय ताकद वाघेरे यांच्या पाठीशी पवार आता उभे करून आपल्याला आव्हान देणाऱ्यांना धडा शिकवतील अशी राजकीय चर्चा आहे. पवारांच्या या राजकीय पॉवरचा उपयोग वाघेरेंना मात्र चांगलाच फायद्याचा ठरणार आहे.

#### मावळमध्ये महाविकास आघाडी सक्रिय-

» मावळ विधानसभेत आमदार सुनील शेळके यांचे मोठे प्रस्थ निर्माण झाले होते. शेळकेंना मानणारा मोठा मतदार आहे. त्यामुळे शेळके यांच्याविरोधात भूमिका घेताना विरोधकांची अडचण होत होती. महाविकास आघडीच्या उमेदवाराला मावळमधून आमदार शेळके यांच्यामुळेच पीछेहाट होईल असे मानले जात होते. हे वेळीच रोखणे गरजेचे असल्याच्या उद्धेशाने शेळके यांच्या राजकीय वारूला रोखण्याचे काम खासदार शरद पवारांनी केले असल्याचे बोलले जात आहे. आत्मविश्वास गमावलेल्या महाविकास आघाडीच्या पदाधिकाऱ्यांना पवारांच्या खंबीर आधाराने पुन्हा चैतन्य आल्याचे दिसत आहे. त्यामुळे मावळ विधानसभेत पवारांच्या वक्तव्यावरून आमदार शेळके निगेटिव्ह गेले असल्याचे राजकीय चित्र सध्या तरी आहे. त्याचा फायदा महाविकास आघाडीच्या उमेदवाराला म्हणजेच संजोग वाघेरे यांना होईल.

---

## सिंहगडावर गिर्यारोहकाला मिळाले जीवदान!

### कौतुकास्पद : चंद्ररंग चॅरिटेबल ट्रस्टच्या स्वयंसेवकांची कामगिरी

। पिंपरी। प्रतिनिधी : महाईन्यूज

**महाशिवरात्रीला सिंहगडावरील तानाजी कड्याजवळ असलेल्या कड्यात गिर्यारोहक अडकला. तब्बल तीन तास अडकून पडलेल्या गिर्यारोहकाची पिंपळेगुरव येथील चंद्ररंग चॅरिटेबल ट्रस्टच्या तीन कर्मचाऱ्यांनी स्थानिक युवकांच्या मदतीने प्राणांची बाजू लावून दोरखंडांच्या सहाय्याने सुखरूप सुटका केली. त्यानंतर त्या गिर्यारोहकाच्या डोळ्यात आनंदाश्रू वाहू लागले. चंद्ररंग चॅरिटेबल ट्रस्टचे संचालक व पिंपरी-चिंचवड शहर भाजपचे अध्यक्ष शंकर जगताप यांनी प्राणांची बाजी लावून युवकाला सुखरूप बाहेर काढणाऱ्या आपल्या कर्मचाऱ्यांचे आणि तेथील स्थानिक युवकांचे अभिनंदन केले आहे.**



महाशिवरात्री निमित्त सिंहगडाच्या परिसरातील शिवकालीन महादेवाच्या मंदिरात दर्शनासाठी जाण्यासाठी शुभम माने (वय २८, रा. चिखली, पिंपरी चिंचवड) सकाळी एकटाच निघाला. अतकरवाडी मार्गावरुन तो सिंहगडावर आला. गडाच्या माथ्यावरील उदयभान समाधी जवळील मार्गाने तो कोळीवाडा (ता. वेल्हे) जवळील उंच डोंगरावरील मेंगजाई मंदिर येथे पोहोचला. मात्र उंच डोंगरावरील मंदिर दूर अंतरावर असल्याने तो अर्धा रस्त्यावरुन माघारी निघाला. गडाच्या पायथ्याहून जुन्या मार्गाने शुभम याने सकाळी साडे दहाच्या सुमारास चढाई सुरु केली. तो तानाजी कड्याच्या लगत असलेल्या तटाखाली अडकून पडला. त्याला पुढे जाता येईना आणि खाली माघारी उतरता येईना. दुर्गम ठिकाणी खोल कड्यात तो अडकला होता.त्यामुळे मदतीसाठी शुभम माने याने जोरात आवाज देणे सुरु केले. त्याचा आवाज ऐकून नरवीर तानाजी मालुसरे समाधीच्या देखभालीसाठी पिंपळेगुरव येथील चंद्ररंग चॅरिटेबल ट्रस्टचे कर्मचारी सुमित रांजणे, दत्ता जोरकर, राहुल जोरकर या तिघांनी स्थानिक युवक महेश सांबरे, सचिन पढेर, रोहित जोरकर, सचिन भांडेकर, समीर रांजणे, दत्तात्रय जोरकर, नंदु जोरकर यांच्यासह कड्याच्या माथ्यावर धाव घेतली. या सर्वांनी दोरखंडाच्या सहाय्याने तब्बल शंभर फुट खोल दरीतून शुभम माने याला सुखरूप बाहेर काढले. त्याच्या हातापायाला खरचटल्याने जखमा झाल्या होत्या.

#### शंकर जगताप यांनी केले अभिनंदन...

»शुभम माने तब्बल तीन तास हा कड्यात अक्षरशः मृत्यूशी झुंज देत होता. महाशिवरात्री उपवासामुळे तो व्याकुळ झाला होता. चंद्ररंग चॅरिटेबल ट्रस्टचे कर्मचारी आणि स्थानिक युवकांनी त्याला मृत्यूच्या दाढेतून बाहेर काढले. त्यावेळी त्याच्या डोळ्यातून आनंदाश्रू वाहू लागले. चंद्ररंग चॅरिटेबल ट्रस्टचे संचालक व पिंपरी-चिंचवड शहर भाजपचे अध्यक्ष शंकर जगताप यांनी प्राणांची बाजी लावून युवकाला सुखरूप बाहेर काढणाऱ्या आपल्या कर्मचाऱ्यांचे आणि तेथील स्थानिक युवकांचे अभिनंदन केले आहे.



## भूमिका

# मानवी हस्तक्षेप इतका वाढला की...

**समुद्रकिनारी जाऊन मस्त उन्हे खात पडावे, अंगांवर लाटा घ्याव्यात, झकास खिदळावे, जमल्यास थोडी अधिक प्रौढ गंमतजंमत करावी, हे तर पर्यटनाचे जुनाट स्वप्न. किंबहुना काही दशकांपूर्वी पर्यटन म्हटले की नारळाचे झाड, समुद्राच्या लाटा नि असले काहीबाहीच जाहिरातींमध्ये दिसायचे.**

आता पर्यटकांच्या झुंडी किनाऱ्यांवरुन उठून डोंगर शोधू लागल्या, कुणी साहसी सहलींच्या निमित्ताने डोंगररांगाकडे निघतात, तर कुणी देवस्थानांच्या भक्तिमार्गावर चालणारे असतात. यापलिकडेही एक शहरी वर्ग असतो तो जंगलांचा अचानक पुळका आलेल्यांचा. अर्थात निसर्गप्रेम हा काही ग्रामीण भागाचा मक्ता नाही, झाडाझुडुंवर खरेखुरे प्रेम करणारी शहरी माणसेही असतातच. पण त्यांची संख्या हाताच्या बोटांवर मोजण्याइतकी.



बरीचशी मंडळी सुट्याबिट्या टाकून अभयारण्यात जाऊन वाघ बघण्याचा थरार अनुभवायला निघतात. बसगाड्या नि लोकलगाड्या बघणाऱ्या आपल्या बच्चेकंपनीला जंगलाची प्रत्यक्ष ओळख करुन देण्याचीही अनिवार इच्छा काही पालकांमध्ये असते. सगळेच निसर्गप्रेम काही 'ॲनिमल प्लॅनेट' बघून व्यक्त होत नसते. त्या टीव्हीच्या पडद्यापलीकडेही हिरवाई असते, वन्यजीव असतात. जंगलातला वाघ असतोच देखणा. त्याचे ते उन्मुक्त वन्य लावण्य डोळ्यांचे पारणे फेडते. आभाळाशी स्पर्धा करणारे ते अर्जुन, सावरी, हिरड्याबेहड्याचे नि साग-पळसाचे वृक्ष वेड लावतात. ती पक्ष्यांची किलबिल, मोरांचा केका, हरणांचे कळप, वानरांची खिसखिस... सारेच गारुड करणारे. या जंगलाचा राजा हा वाघ. हे जनावर वाचले तर जंगल वाचणार. जंगल नावाची 'इकोसिस्टिम' हा वाघच चालवत असतो. त्याच्या ओढीने शहरी पर्यटक जंगलांकडे निघतात. एक पर्यटनाचा प्रवाह निर्माण होतो. हाटेले, उपाहारगृहे, तंबू, जीपगाड्या, खानपान, छायाचित्रण अशी एक वेगळी परिसंस्था उभी राहाते. या परिसंस्थेच्या केंद्रस्थानी मात्र वाघ नसतो. ती जागा घेतलेली असते, फुगलेल्या खिश्यांनिशी आलेल्या पर्यटकाने. इथं टायगर नव्हे, टूरिस्टाला नायक समजले जाते. इथेच सगळा मामला बिघडतो. जिम कॉर्बेट राष्ट्रीय अभयारण्यात पर्यटकांच्या सोयीसुविधांसाठी हजारो झाडे कापून पर्यटन केंद्र उभारणीची जागा साफसूफ करण्यात आली. उत्तराखंडचे तत्कालीन वनमंत्री हरकसिंग रावत आणि वनअधीक्षक किशनचंद या दोघांनी सगळे कायदेकानू धाब्यावर बसवत 'जिम कॉर्बेट'च्या दारात 'विकास' आणला. हे हरकसिंग रावत तेव्हा, म्हणजे २०२१ मध्ये भाजप सरकारमध्ये वनमंत्री होते, नंतर त्यांनी वाघासारखेच कॉंग्रेसमध्ये स्थलांतर केले!सर्वोच्च न्यायालयात हे प्रकरण होते. या रावतमहाशयांवर संतप्त ताशेरे ओढत सर्वोच्च न्यायालयाच्या खंडपीठाने जंगलाचे झालेले नुकसान यांच्याकडून भरून घ्या, असा आदेश काढला आहे. नागरिकांचा विश्वास कचरापेटीत टाकण्याची ही सत्ताधाऱ्यांची कृती केवळ न्यायालयालाच नव्हे, तर कुठल्याही सच्च्या निसर्गप्रेमी व्यक्तिला संताप आणणारी आहे.

अभयारण्ये किंवा राष्ट्रीय वने निर्माण करण्यामागचा हेतू वन्यजीवांचे संरक्षण आणि संवर्धन हा एकमेव असतो. पर्यटनाची संधी हा काही त्याचा प्रमुख हेतू नव्हे. पण वन्यजीवांचे संवर्धन हे पैसा घालवणारे काम आहे, आणि त्यांच्या जीवावर पर्यटक मिळवणे हे पैसा कमावण्याचे साधन आहे. हेतू बदलला की आपोआप प्राधान्यक्रम बदलतात. जिम कॉर्बेट नॅशनल पार्कबाबत नेमके हेच झाले आहे.

वारेमाप जंगलतोड हे काही फक्त जिम कॉर्बेट अभयारण्याचे दु:ख नाही. जगातील बहुतेक सर्वच जंगलांची जमेल तितकी हेळसांड मानवप्राण्यातर्फे चालू आहे. 'जिम कॉर्बेट' प्रकरणाने राजकीय वळण घेतल्याने त्याची चर्चा झाली. शिवाय हे 'नॅशनल पार्क' भारतातले अगदी पहिले! जिथे वाघांच्या आणि अन्य वन्यजीवांच्या अनेक पिढ्या सुखाने नांदल्या, तिथे आता मानवी हस्तक्षेप इतका वाढला की कोअर विभागाच्या जवळपासही पर्यटकांच्या जीपगाड्या फिरता कामा नयेत, असा आदेश सर्वोच्च न्यायालयाला काढावा लागला. रावत आणि किशन चंद यांच्या बेमुर्वतपणामुळे येथील वाघांचा वावरही नष्ट झाला आहे.सत्तेच्या जोरावर आणि पैशाच्या लोभापायी इतके दुस्साहस करणे यांना का आणि कसे जमले?

## संपादकीय »

# शिकविणे नव्हे!

***शिक्षणतज्ज्ञ त्या विषयातील आधुनिक विचारप्रवाह यावर पॉवर पॉइंट प्रेझेंटेशन करतात; विद्यार्थी मात्र त्यांच्या स्वत:च्या संगणक आणि मोबाईलमध्येच गर्क असतात.***

एक प्रमुख शैक्षणिक संस्था परदेशातील नामांकित शिक्षणतज्ज्ञांना व्याख्यानासाठी आमंत्रित करते. विद्यार्थ्यांना त्यांची आवड लक्षात न घेता या व्याख्यानासाठी उपस्थित राहण्यास सांगितले जाते. हॉल जेमतेम भरलेला असतो, बहुतेक विद्यार्थ्यांना, अनेक श्रोत्यांना व्याख्यानाच्या विषयात रस असल्याचे दिसत नाही. शिक्षणतज्ज्ञ त्या विषयातील आधुनिक विचारप्रवाह यावर पॉवर पॉइंट प्रेझेंटेशन करतात; विद्यार्थी मात्र त्यांच्या स्वत:च्या संगणक आणि मोबाईलमध्येच गर्क असतात. सादरीकरणामधली माहिती चांगली असते, पण सहभागी झालेल्यांना यातून शिकता आलं का?. संस्थेने या विषयाची आवड असलेल्यांना उपस्थित राहण्याचे आमंत्रण दिले. शिक्षणतज्ज्ञ सहभागी झालेल्यांचे गट बनवतात, त्यांना या विषयाबद्दल आधीपासून माहीत असलेल्या गोष्टी, त्यांची मते काय आहेत.

आजकाल कष्टाने मोठी केलेली मुले-मुलीदेखील आपल्या आई-वडिलांना वाऱ्यावर सोडतात. त्यांच्या उदरनिर्वाहाची, औषधपाण्याची विचारपूस करत नाहीत. अशावेळी पालक न्यायालयाचे दरवाजे ठोठावून पोटगी मिळण्यासाठी दाद मागू शकतात. त्याविषयी.

# आई-वडिलांनाही मिळते पोटगी

दोन मुलींनंतर मुलगा व्हावा यासाठी आई-वडिलांनी नवसाचा गणपती बसवला, देवकृपेने मुलगा झालादेखील. मुलाचे छान शिक्षण करून दिले, मुलाच्या आवडीची मुलगी बघून लग्नदेखील करून दिले. आई-वडिलांचे कर्तव्य संपले. आता मुलगा, सून, नातवंडे यांच्यासोबत छान सुखाचे दिवस जगण्याचे त्यांचे दिवस आले. परंतु होत्याचे नव्हते झाले; एका वर्षाच्या आतच सुनेमध्ये आणि आई-वडिलांमध्ये छोटे छोटे वाद होऊ लागले. सुनेने मुलाला आई-वडिलांविरुद्ध कान भरायला सुरुवात केली आणि बघता बघता मुलाने आई-वडिलांचे घर अगदी एका दिवसातच सोडले. ...मग गणपती बसवायची वेळ आली. आई-वडिलांनी मुलाला फोन केला, तर त्याने चक्क उत्तर दिले, “मी गणपती बसवायला येणार नाही आणि तुम्हाला जमत नसेल तर प्रथा बंद करा”. हे ऐकून आई-वडिलांना धक्काच बसला. वडिलांना जेमतेम पाच हजार रुपये पेन्शन होती. त्यात उभयतांचे भागत नव्हते, म्हणून मुलाला काही आर्थिक मदत करण्यास



सांगितले. तेव्हा मुलाने, “मला परत फोन करू नका. माझा तुमचा काही संबंध नाही”, असे उत्तर दिले. नातेवाईकांचा सल्ला घेऊन आई-वडिलांनी मुलाविरुद्ध न्यायालयात जाण्याचा निर्णय घेतला. निर्णय घेत असताना समाज काय म्हणेल? याची मोठी भीती वाटत होती. परंतु औषधोपचाराला पैसे नसल्याने म्हातारपणाचा आधार असलेल्या मुलाकडे पैसे मागण्याशिवाय पर्याय नव्हता. यासाठी न्यायालयीन व कायद्याची मदत घ्यावी लागली.आई-वडिलांना मुले सांभाळत नसतील किंवा आर्थिक मदत करत नसतील तर आपल्या मुलाच्या किंवा मुलीच्या विरुद्ध न्यायालयामध्ये पोटगीसाठी विविध कायद्यांतर्गत दावा दाखल करू शकतात. वयोवृद्ध आई-वडिलांची मुलेही वृद्ध असून त्यांनादेखील काही उत्पन्नाचे साधन नसेल; तर असे वयस्कर ज्येष्ठ नागरिक आपल्या नातवंडांकडे ही पोटगी मागू शकतात.कोणत्या कायद्याच्या तरतुदीखाली आई-वडिलांना पोटगी मिळू शकते? सर्वात प्रथम ज्येष्ठ नागरिकांचा निर्वाह व कल्याण अधिनियम २००७ अंतर्गत ज्येष्ठ नागरिक जे साठ वयापुढे आहेत, ते पोटगीसाठी दावा दाखल करू शकतात. तसेच फौजदारी प्रक्रिया संहितेनुसार कलम १२५ नुसार कोणत्याही धर्माचे आई-वडील मुलांकडे पोटगीसाठी दावा दाखल करू शकतात. कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण कायद्यांतर्गत ज्येष्ठ महिला (आई, आजी) या आपल्या मुलांकडे पोटगी मागू शकतात. आई, वडील व ज्येष्ठ नागरिक यांच्या हक्कांचे संरक्षण करण्यासाठी, त्यांना सन्मानाने आयुष्य व्यतीत करता यावे, या उद्देशाने आई-वडील व ज्येष्ठ नागरिकांचा निर्वाह व कल्याण अधिनियम २००७ मध्ये अंमलात आला आहे. सर्व दाव्यांमध्ये पोटगी मिळू शकते.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# हल्ली कोण कुठंय हेच कळत नाही!

## राष्ट्रवादी काँग्रेसचं नाव घेऊन राज ठाकरेंची खोचक टीका

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**आगामी लोकसभा निवडणुकांसाठी राज्यात सर्वच पक्षांनी कंबर कसलेली असताना आघाड्या आणि जागावाटपासाठी जोरदार तयारी सुरू झाली आहे. यासंदर्भात मनसेची नेमकी काय भूमिका असणार आहे? याविषयी अद्याप तर्क-वितर्क लावले जात आहेत. मनसेच्या नेत्यांकडून राज ठाकरेच अंतिम निर्णय घेतील, असं सांगितलं जात आहे. या पार्श्वभूमीवर आज नाशिकमध्ये झालेल्या मनसेच्या १८व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित मेळाव्यात राज ठाकरेंनी सर्वच पक्षांवर टीका केली.**

भाजपा, काँग्रेस, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस यांच्या त्या त्या काळातील सरकारांवर त्यांनी हल्लाबोल केला. त्याचवेळी सध्या सुरू असलेल्या राजकीय घडामोडींवरही त्यांनी भाष्य केलं."जेव्हा मी एखादी गोष्ट बोलतो, तुम्ही त्यावर रिॲक्ट होता, ते लोकांपर्यंत पोहोचत नाही असं तुम्हाला वाटतंय का? ते व्यवस्थित पोहोचतंय. मी फिरत असताना अनेक माता-भगिनी माझे हात धरून सांगतात, 'आता बाबारे विश्वास तुझ्यावरच आहे'. तो विश्वास टिकवणं हीच सर्वात मोठी गोष्ट आहे. बाकीच्यांनी तो विश्वास घालवला आहे", असं राज ठाकरे म्हणाले."ज्या प्रकारचं राजकारण सध्या चालू आहे..

कोण कुठे आहे हेच कळत नाहीये. कुणाचंही नाव घेतलं तर विचारावं लागतं कुठे आहे तो? मला नाट्य संमेलनात पाच नगरसेवक भेटायला आले. म्हणाले, 'नमस्कार, आम्ही राष्ट्रवादीचे नगरसेवक आहोत'. पण कुणाचे? तर तीन म्हणाले 'आम्ही शरद पवारांचे', दोन बोलले 'आम्ही अजित पवारांचे'. पण आले होते एकत्र. माझं अजूनही ठाम मत आहे की सगळे आतून एकच आहे. फक्त तुम्हाला येडे बनवत आहेत. मूर्ख बनवत आहेत. यांचं आपापसांत राजकारण चालू आहे आणि महाराष्ट्राची फक्त माती होत आहे", अशी टीका राज ठाकरेंनी यावेळी केली."महाराष्ट्र



एकसंघ राहू नये, यासाठी जातीचं विष पसरवलं जात आहे. जरांगे पाटील उपोषणाला बसले होते तेव्हा त्यांच्यासमोर मी सांगितलं होतं की हे होणार नाही. पण होणार नाही याचा अर्थ होऊ नये असा नाही. तांत्रिकदृष्ट्या ते होऊ शकत नाही. मागे सगळे मोर्चे निघाले होते. सगळे मुंबईत आले वगैरे. पण पुढे काय झालं? माझी मराठा बांधवांना विनंती आहे की यांच्या भूलथापांना बळी पडू नका. जी गोष्ट होऊ शकत नाही, याची हे आश्वासनं देत आहेत", असंही राज ठाकरे म्हणाले."आज विषय मुलांच्या नोकऱ्यांचा, शिक्षणाचा आहे. बाहेरच्या राज्यांमधले लोक आम्ही पोसायचे आणि आमच्याकडची मुलं आंदोलन करणार? जन्माला येणाऱ्या प्रत्येकाला शिक्षण व रोजगार देणं महाराष्ट्राला सहज शक्य आहे. पण महाराष्ट्र एकसंघ राहू नये यासाठी विष कालवायला हे बसलेच आहेत", अशा शब्दांत राज ठाकरेंनी महाराष्ट्रातील राजकीय नेतेमंडळींवर टीकास्त्र सोडलं.भाजपा, काँग्रेस, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस यांच्या त्या त्या काळातील सरकारांवर त्यांनी हल्लाबोल केला. त्याचवेळी सध्या सुरू असलेल्या राजकीय घडामोडींवरही त्यांनी भाष्य केलं."जेव्हा मी एखादी गोष्ट बोलतो, तुम्ही त्यावर रिॲक्ट होता, ते लोकांपर्यंत पोहोचत नाही असं तुम्हाला वाटतंय का? ते व्यवस्थित पोहोचतंय. मी फिरत असताना अनेक माता-भगिनी माझे हात धरून सांगतात, 'आता बाबारे

### बटाटा टाकला की तळून आला पाहिजे

» गेल्या अठरा वर्षात अनेक चढ -उतार पाहिले, चढ कमी उतारच जास्त पाहिले. याकाळात तुम्ही सगळे माझ्यासोबत राहीले. पण महाराष्ट्र सैनिकांनो संयम ठेवा, यश कुठेही जात नाही, ते मी तुम्हाला मिळवून दिल्याशिवाय राहत नाही. इतर पक्षांना जे यश मिळाले आहे, ते सहज मिळालेले नाही त्यासाठी त्यांना बरीच मेहनत घ्यावी लागली आहे. त्यामुळे संयम ठेवा असा सल्ला राज ठाकरे यांनी मनसैनिकांना दिला आहे. मनसेचा 18 वा वर्धापन दिन नाशिक मध्ये पार पडतो आहे. यावेळी राज ठाकरे यांनी मनसैनिकांना मार्गदर्शन केले. राज ठाकरे म्हणाले., मला माझ्या कडेवर माझी पोरं खेळवायची आहेत, सध्या महाराष्ट्रात दुसऱ्याची पोरं कडेवर घेऊन जो आनंद काही जणांना मिळतोय तो मला नकोय, माझीच पोरं माझ्याच कडेवर घेऊन फिरण्याची माझ्यात ताकद आहे, असा टोला लगावत राज्यातील राजकीय घडामोडींवर राज ठाकरे यांनी प्रखर शब्दात टीका केली.बटाटा टाकला की तळून आला पाहिजे, अशी मानसिकता आजकाल सगळ्यांची झाली आहे. मात्र राजकारणात तुम्हाला वावरायचे, टिकायचे असेल तर पेशन्स ठेवावा लागतो. फक्त नरेंद्र मोदींमुळे आलेलं यश नाही तर त्यासाठी भाजपच्या स्थापनेपासून ते आजपर्यंत अनेकांनी खूप खस्ता खाल्ल्याने व मेहनतीतून आलेलं ते यश असल्याचे राज ठाकरे म्हणाले.

विश्वास तुझ्यावरच आहे'. तो विश्वास टिकवणं हीच सर्वात मोठी गोष्ट आहे. बाकीच्यांनी तो विश्वास घालवला आहे", असं राज ठाकरे म्हणाले."ज्या प्रकारचं राजकारण सध्या चालू आहे.. कोण कुठे आहे हेच कळत नाहीये. कुणाचंही नाव घेतलं तर विचारावं लागतं कुठे आहे तो? मला नाट्य संमेलनात पाच नगरसेवक भेटायला आले. म्हणाले, 'नमस्कार, आम्ही राष्ट्रवादीचे नगरसेवक आहोत'. पण कुणाचे? तर तीन म्हणाले 'आम्ही शरद पवारांचे', दोन बोलले 'आम्ही अजित पवारांचे'. पण आले होते एकत्र. माझं अजूनही ठाम मत आहे की सगळे आतून एकच आहे. फक्त तुम्हाला येडे बनवत आहेत. मूर्ख बनवत आहेत. यांचं आपापसांत राजकारण चालू आहे आणि महाराष्ट्राची फक्त माती होत आहे.

# तुम्ही कोणत्या धरणाच्या सिंचनातून साम्राज्य उभारलं?

## रोहित पवारांची काका अजित पवारांच्या साम्राज्यावर टीका

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**राष्ट्रवादीच्या शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांच्या बारामती अॅग्रो लि. कारखान्याची मालकी असलेल्या कन्नड सहकारी साखर कारखान्यामधील मालमत्तेवर ईडीने शुक्रवारी जप्तीची कारवाई केली.**

यावेळी ईडीने ५०.२० कोटींच्या मालमत्तेवर टाच आणली. या कारवाईनंतर रोहित पवार यांनी एक्स अकाऊंटवर





सविस्तर भूमिका व्यक्त केली होती. माझ्यावर कितीही दबाव आणला तरी मी भाजपामध्ये जाणार नाही, असे त्यांनी ठामपणे म्हटले होते. त्यानंतर आज पुन्हा एकदा त्यांनी एक्स अकाऊंटवरून काका अजित पवार यांच्यावर निशाणा साधला आहे."युवा आणि सर्वसामान्यांच्या प्रश्नांवर तळमळीतून एका 'बच्चा'ने ८०० कि.मी. ची पायी संघर्षयात्रा काढली त्यावेळी 'यांनी काय संघर्ष केला' अशी टीका काहींनी केली. त्यांना सांगायचंय की, बुलेट ट्रेनपेक्षाही अधिक वेगाने भूमिका बदलत द्वेष पसरवणाऱ्या 'मित्रा'बरोबर जाऊन सत्तेचं संरक्षण घेतल्यानंतर तुम्हाला अशी टीका करायला सुचते, पण माझा संघर्ष जगजाहीर आहे आणि व्यवसाय कसा उभा केला हे सांगण्याचं धाडसही माझ्यात आहे", अशी भूमिका रोहित पवार यांनी एक्सवर केलेल्या पोस्टमध्ये मांडली.रोहित पवार पुढे अजित पवारांना उद्देशून म्हणाले, "पण तुम्ही कोणता संघर्ष करुन आणि कोणत्या 'धरणा'तून 'सिंचन' करुन साम्राज्य उभं केलं, हे सांगण्याची हिंमत तुमच्यात आहे का? माझ्यावरील कारवाईवरून आज तुम्हाला व तुमच्या नवीन मित्राला गुदगुल्या होत असतील पण लोकसभा निवडणुकीत जनताच तुम्हाला वाकुल्या दाखवल्याशिवाय राहणार नाही.

### साखर कारखाने लिलावाद्वारे खरेदी

» शुक्रवारी ईडीने 'बारामती ॲग्रो लि.' कंपनीची मालकी असलेल्या 'कन्नड सहकारी कारखाना लि.' या कारखान्याची १६१.३० एकर जमीन, प्लांट, यंत्र आणि इमारत इत्यादींवर जप्तीची कारवाई केली. संशयास्पद व्यवहार करून तोट्यात गेलेले साखर कारखाने लिलावाद्वारे खरेदी केल्याचा आरोप आहे.

# नमाज पढणाऱ्यांना लाथ मारुन हाकललं!

## पोलिस उपनिरीक्षकाला तत्काळ करण्यात आले निलंबित

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**दिल्लीतील इंद्रलोक येथील एका रस्त्यावर शुक्रवारी दुपारी एका मशिदीबाहेर नमाज अदा करणाऱ्या जमावाला दिल्ली पोलीस उपनिरीक्षकाने लाथ मारून हटवल्याचा प्रकार कॅमेरात कैद झाला होता. यानंतर या पोलिस उपनिरीक्षकाला तत्काळ निलंबित करण्यात आले आहेत. उत्तर दिल्लीतील इंद्रलोक पोलिस चौकीचे प्रभारी उपनिरीक्षक मनोज कुमार तोमर (३५) असे या अधिकाऱ्याचे नाव आहे. या घटनेमुळे परिसरात तणाव आणि निदर्शने झाली होती ज्यानंतर तातडीने कारवाई करण्यात आली.**



या घटनेचा व्हिडिओ सुद्धा सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. यामध्ये तोमर हे नमाज अदा करणाऱ्या काही पुरुषांना लाथ मारताना आणि ढकलताना दिसत आहे. तर व्हिडिओ क्लिपमध्ये अन्य दोन पोलीस तोमर यांच्या मागे फिरताना दिसतायत जे या जमावाला आपली चटई उचलून तिथून निघून जाण्यासाठी ओरडत आहेत. नमाज पठण सुरू झाल्यानंतर १० मिनिटांनी तोमर यांनी या गर्दीतील काहींना लाथ मारली आणि घटनास्थळ सोडून जाण्यासाठी सांगितले, हा प्रकार उपस्थितांनी मोबाईलमध्ये रेकॉर्ड करून मग हा व्हिडीओ व्हायरल केला.नमाज अदा करणाऱ्यांपैकी काही प्रत्यक्षदर्शींच्या माहितीनुसार, नमाजासाठी जमा झालेली ही गर्दी मशिदीपासून बाहेरच्या रस्त्यावर पसरली होती, परंतु वाहतुकीला अडथळा होत नव्हता. सदर घटनेच्या वेळी उपस्थित असलेल्या एका व्यक्तीने (नाव उघड न करण्याच्या अटीवर) इंडियन एक्सप्रेसला सांगितले की, "आम्ही रस्ता अडवत नव्हतो. नमाज पठण करण्यासाठी मशिदीच्या बाजूला फक्त एक अरुंद मार्ग वापरला जात होता आणि वाहतूक दर शुक्रवारी सुरळीत चालू होती. घटना घडली तेव्हा आम्ही आमची चटई पसरून नमाज पठण करण्यासाठी बसलो होतो. पोलीस कर्मचारी मागून आमच्या जवळ आले आणि आम्हाला जबरदस्ती करून निघून जाण्यास सांगत होते, दर शुक्रवारी आम्ही नमाज अदा करतो तेव्हा जवळच्या पोलिस चौकीतून या ठिकाणी पोलिसांना तैनात केले जाते, पण असे पहिल्यांदाच घडले आहे."दरम्यान, या घटनेनंतर तोमर यांच्यावर कारवाईची मागणी करत पोलिस चौकीबाहेर जमाव गोळा झाला होता. कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी डीसीपी-स्तरीय आणि संयुक्त सीपी-स्तरीय अधिकाऱ्यांसह दंगल-नियंत्रण वाहने आणि निमलष्करी दलांसह परिसरात सुरक्षा वाढविण्यात आली होती. जमावाला उत्तर देताना पोलिस उपायुक्त (उत्तर) मनोज कुमार मीना यांनी सांगितले की, "तोमर मागील दोन महिन्यांपासून इंद्रलोक चौकीत तैनात होते. कोणतीही अधिकृत तक्रार दाखल केलेली नसली तरी पोलीस उपनिरीक्षक तोमर यांच्याविरुद्ध शिस्तभंगाची कारवाई सुरू केली जाईल. त्यांच्या विरोधात यापूर्वी काही तक्रारी दाखल झाल्या आहेत का ते तपासले जाईल. सध्या व्हिडिओच्या आधारे त्यांच्यावर कारवाई करून निलंबित करण्यात आले आहे. पुढील कार्यवाही लवकरच केली जाईलजॉय टिर्की यांनी 'एक्स' वर सोशल मीडिया पोस्टमध्ये म्हटले की, "कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी पोलिसांना जनतेने नेहमीच पाठिंबा दिला आहे. मात्र इंद्रलोक येथील घटनेचा आम्ही निषेध करतो. या पार्श्वभूमीवर सर्व पोलीस कर्मचाऱ्यांना कडक सूचना देण्यात आल्या आहेत. सर्वांनी सामाजिक सौहार्द राखावे आणि अफवांवर लक्ष देऊ नये."दुसरीकडे सदर व्हिडीओ व्हायरल झाल्यावर ईशान्य दिल्ली भागातील जनतेने मात्र पोलिसांची बाजू घेतली आहे. इतक्या मशिदी असताना रस्त्यावर उतरण्याची आवश्यकताच काय होती असेही प्रश्न केले जात आहेत. तर काहींनी यावर पोस्ट करताना पोलिसांनी त्यांना जाण्यासाठी सांगणे हे चुकीचे नसले तरी लाथ मारायची गरज नव्हती असेही मत व्यक्त केले आहे.या घटनेचा व्हिडिओ सुद्धा सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. यामध्ये तोमर हे नमाज अदा करणाऱ्या काही पुरुषांना लाथ मारताना आणि ढकलताना दिसत आहे. तर व्हिडिओ क्लिपमध्ये अन्य दोन पोलीस तोमर यांच्या मागे फिरताना दिसतायत जे या जमावाला आपली चटई उचलून तिथून निघून जाण्यासाठी ओरडत आहेत.

### व्हिडीओ केला व्हायरल

» नमाज पठण सुरू झाल्यानंतर १० मिनिटांनी तोमर यांनी या गर्दीतील काहींना लाथ मारली आणि घटनास्थळ सोडून जाण्यासाठी सांगितले, हा प्रकार उपस्थितांनी मोबाईलमध्ये रेकॉर्ड करून मग हा व्हिडीओ व्हायरल केला.माहितीनुसार, नमाजासाठी जमा झालेली ही गर्दी मशिदीपासून बाहेरच्या रस्त्यावर पसरली होती, परंतु वाहतुकीला अडथळा होत नव्हता. सदर घटनेच्या वेळी उपस्थित असलेल्या एका व्यक्तीने (नाव उघड न करण्याच्या अटीवर) इंडियन एक्सप्रेसला सांगितले की, "आम्ही रस्ता अडवत नव्हतो. नमाज पठण करण्यासाठी मशिदीच्या बाजूला फक्त एक अरुंद मार्ग वापरला जात होता आणि वाहतूक दर शुक्रवारी सुरळीत चालू होती. घटना घडली तेव्हा आम्ही आमची चटई पसरून नमाज पठण करण्यासाठी बसलो होतो. पोलीस कर्मचारी मागून आमच्या जवळ आले आणि आम्हाला जबरदस्ती करून निघून जाण्यास सांगत होते, दर शुक्रवारी आम्ही नमाज अदा करतो तेव्हा जवळच्या पोलिस चौकीतून या ठिकाणी पोलिसांना तैनात केले जाते, पण असे पहिल्यांदाच घडले आहे.

---

# निवडणुकीच्या तोंडावर काँग्रेसला मध्य प्रदेशमध्ये झटका

## संजय शुक्ला, अर्जुन पालिया, विशाल पटेल यांचा भाजपात प्रवेश

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**लोकसभेची निवडणूक तोंडावर असताना काँग्रेसला मध्य प्रदेशमध्ये मोठा झटका बसला आहे. येथील बडे नेते तथा माजी केंद्रीय मंत्री सुरेश पचौरी, माजी खासदार गजेंद्र सिंह राजुखेडी तसेच अन्य नेत्यांनी ९ मार्च रोजी भाजपात प्रवेश केला आहे. मध्य प्रदेशचे मुख्यमंत्री मोहन यादव, मध्य प्रदेश भाजपाचे प्रदेशाध्यक्ष व्ही डी शर्मा तसेच माजी मुख्यमंत्री शिवराजसिंह चौहान यांच्या उपस्थितीत या नेत्यांनी भाजपात प्रवेश केला आहे.**





काँग्रेसला सोडचिठ्ठी देत भाजपात प्रवेश करणाऱ्यांमध्ये संजय शुक्ला, अर्जुन पालिया, विशाल पटेल या नेत्यांचाही समावेश आहे. पचौरी हे गांधी घराण्याच्या जवळचे मानले जायचे. ते केंद्रीय संरक्षण राज्यमंत्री होते. ते चार वेळा राज्यसभेचे खासदार राहिलेले आहेत. ते मध्य प्रदेश काँग्रेसचे मोठे आणि महत्त्वाचे नेते होते. मात्र लोकसभेची निवडणूक अवघ्या काही दिवसांवर आलेली असताना त्यांनी काँग्रेसला सोडचिठ्ठी देऊन थेट भाजपात प्रवेश केला आहे.काँग्रेसमध्ये असताना पचौरी यांनी अनेक महत्त्वाची पदे भूषवलेली आहेत. ते मध्य प्रदेश काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष होते. ते युवक काँग्रेसचेही राज्य अध्यक्ष राहिलेले आहेत. तर राजुखेडी हे आदिवासी समाजातील मोठे नेते मानले जातात. ते १९९८, १९९९ आणि २००९ अशा एकूण तीन वेळा काँग्रेसच्या तिकिटावर धार या जागेवरून खासदार झालेले आहेत.काँग्रेसमध्ये प्रवेश करण्याआधी ते भाजपात होते. १९९० साली ते भाजपाच्या तिकिटावर आमदार झाले होते.


### मनातील शब्द तोंडावर

» शुक्ला यांनी भाजपचे उमेदवार असलेले कैलाश विजयवर्गीय यांच्यावर गंभीर आरोप केले होते. पश्चिम बंगालमध्ये विजयवर्गीय यांच्यावर अनेक गुन्हे आहेत. त्यांनी भू-माफियांना आश्रय दिलाय असा आरोप त्यांनी केला होता. एका बैठकीमध्ये दोघांमध्ये चांगलीच बाचाबाची झाल्याचं देखील पाहायला मिळालं होतं.संजय शुक्ला यांना ५७ हजार ७१९ मतांनी हरवून कैलाश विजयवर्गीय आमदार बनले. आता ते मध्य प्रदेश सरकारमध्ये मंत्री आहेत. आज त्यांच्याच उपस्थित अनेक काँग्रेस नेत्यांचा भाजप प्रवेश होताय. संजय शुक्ला देखील भाजपमध्ये येत आहेत. त्यावेळी त्यांच्या मनातील शब्द तोंडावर आल्याचं बोललं जात आहे.

# दारा सिंहला शॅम्पेन पिताना पाहून बिग बी चक्रावले होते

कुस्तीपटू आणि अभिनेता दारा सिंग हे रामानंद सागर यांच्या ‘रामायण’मधील हनुमानाच्या भूमिकेसाठी प्रचंड लोकप्रिय होते. २०१२ मध्ये वयाच्या 83 व्या वर्षी त्यांचे निधन झाले. दिवंगत अभिनेत्याचा मुलगा विंदू दारा सिंग याने अलीकडेच त्यावेळचा एक किस्सा शेअर केला. आपल्या वडिलांच्या मृत्यूनंतर विंदू आणि त्याच्या घरच्यांनी शॅम्पेन पिऊन त्यांचे जीवन साजरा केले होते अन् नेमके त्यावेळी त्यांच्या घरी अमिताभ बच्चन आले. हाच किस्सा विंदू यांनी शेअर केला आहे. यूट्यूबर सिद्धार्थ कन्नन संवाद साधताना विंदू दारा सिंह म्हणाला, “माझ्या वडिलांनी सांगितले होते, ‘जेव्हा मी हे जग सोडून जाईन, तेव्हा त्या दिवशी मी जेवढ जगलो त्याचं सेलिब्रेशन कर, रडू नकोस.’ ज्या दिवशी वडिलांचे निधन झाले तेव्हा रात्री आमचे संपूर्ण कुटुंब तिथे उपस्थित होते, तेंव्हा मला बाबांनी सांगितलेली गोष्ट आठवली, त्यामुळे सर्वांचा निरोप घेतल्यानंतर आम्ही शॅम्पेनची बाटली उघडून पिण्यास सुरुवात केली अन् पार्टी करू लागलो, सगळेच यावेळी वडिलांची आठवण काढत होते.”जेव्हा विंदू आणि त्याचे कुटुंबीय हे सेलिब्रेशन करत होते तेव्हा नेमके अमिताभ बच्चन त्यांच्या घरी आले. त्या घटनेबदल बोलताना विंदू म्हणाला,





“त्यावेळी दरवाजाची बेल वाजली अन् दार उघडले तर खुद्द बच्चन साहेब तिथे होते. त्यादिवशी अमिताभ बच्चन त्यांच्या चित्रीकरणात व्यस्त असल्याने ते रात्री आम्हा कुटुंबियांना भेटायला आले होते. आमच्या हातात शॅम्पेनचे ग्लास पाहून त्यांनी मला विचारले की नेमकं काय सुरू आहे? त्यावेळी मी सांगितलं की बाबांनी सांगितलं होतं की ते जेव्हा या जगातून जातील तेव्हा त्यांचे जीवन साजरे करा, त्यामुळे आम्ही तेच करत आहे.” पुढे विंदू म्हणाला, “त्यांनी त्यावर मला काहीच उत्तर दिलं नाही अन् थेट ते माझ्या आईला भेटायला गेले अन् तिच्याशी बोलू लागले. पण आमच्या हातातले ग्लास आणि एकूणच तिथलं वातावरण पाहून ते चांगलेच आश्चर्यचकित झाले होते हे त्यांच्या चेहऱ्यावर स्पष्टपणे दिसत होते.” २०१२ मध्ये जेव्हा दारा सिंह यांचे निधन झाले तेव्हा अमिताभ बच्चन व अभिषेक बच्चन यांनी ट्वीट करत त्यांचे दुःख व्यक्त केले होते.

## मीरा लग्नबंधनात अडकणार !

प्रियांका चोप्राची चुलत बहीण अभिनेत्री मीरा चोप्रा लवकरच लग्नबंधनात अडकणार आहे. तिची लग्नपत्रिका सोशल मीडियावर व्हायरल होत आहे, ज्यात लग्नाआधीच्या सर्व सोहळ्यांबद्दल माहिती देण्यात आली आहे. मीरा राजस्थानमधील जयपूरमध्ये लग्नगाठ बांधणार आहे. तिच्या होणाऱ्या पतीचं नाव रक्षित केजरीवाल आहे. मीरा चोप्रा ही सुदेश व नीलम चोप्रा यांची लेक आहे. ती रक्षित केजरीवालशी जयपूरमध्ये १२ मार्च रोजी लग्न करणार आहे. त्यांच्या लग्नाच्या विधींना मेहेंदीपासून सुरुवात होईल. मेहेंदी समारंभ ११ मार्च रोजी संध्याकाळी होईल, संगीत व कॉकटेल ११ मार्चला संध्याकाळी सात वाजता सुरू होईल, त्यांचा हळदी समारंभ १२ मार्चला सकाळी १० वाजता होईल आणि त्याच दिवशी सायंकाळी साडेचार वाजता हे जोडपं लग्नबंधनात अडकेल.

## शिल्पाचं सडेतोड उत्तर




शिल्पा शेट्टी ही बॉलीवूडमधील आघाडीची अभिनेत्री आहे. शिल्पाचा पती राज हा प्रसिद्ध उद्योगपती आहे. शिल्पाने राजशी पैशांसाठी लग्न केल्याची टीका अनेकदा तिच्यावर केली जाते, या गोष्टीवरून तिला ट्रोलही केलं जातं. आता शिल्पाने या टीकेला सडेतोड उत्तर दिलं आहे. राज श्रीमंत आहे हे गुगल करताना ते माझ्याबद्दल माहिती काढायला विसरले होते, अशा शब्दांत तिने ट्रोलर्सना सुनावलं आहे. ‘झूम’ शी बोलताना शिल्पा शेट्टी म्हणाली, “जेव्हा मी राजशी लग्न केले तेव्हा गुगलच्या मते तो १०८ वा सर्वात तरुण किंवा सर्वात श्रीमंत ब्रिटिश भारतीय होता, ही चांगली गोष्ट आहे. मात्र, त्यावेळी गुगलवर शिल्पाबद्दल माहिती काढायले लोक विसरले, जी स्वतःही श्रीमंत होती. मी आता अजून जास्त श्रीमंत झाले आहे आणि माझे सर्व आयकर, जीएसटी बिलं भरते.”शिल्पा पुढे म्हणाली, “एक यशस्वी महिला तिच्या जोडीदारामध्ये फक्त पैसा शोधत नाही. राज श्रीमंत होता म्हणून मी त्याच्याशी लग्न केलं नाही, कारण पैसा माझ्यासाठी कधीच महत्त्वाचा नव्हता. राजपेक्षाही खूप श्रीमंत लोक होते ज्यांना मी आवडायचे, पण राज माणूस म्हणून कसा आहे हे जाणून घेतल्यानंतर मी लग्न केलं. जर त्याच्याकडे पैसे असते.

## सिद्धार्थ बोडकेचा व्हिडीओ आला समोर

‘झी मराठी’ वाहिनीवरील लोकप्रिय मालिका ‘सातव्या मुलीची सातवी मुलगी’ मधील नेत्रा अर्थात अभिनेत्री तितीक्षा तावडे काही दिवसांपूर्वी लग्नबंधनात अडकली. २६ फेब्रुवारीला तिने अभिनेता सिद्धार्थ बोडकेबरोबर लग्नगाठ बांधून आयुष्याच्या नव्या प्रवासाला सुरुवात केली. लग्नाच्या सात दिवसांनी अभिनेत्री कामाला लागली आहे. ‘सातव्या मुलीची सातवी मुलगी’च्या सेटवर तितीक्षाचं स्वागत करण्यात आलं. त्यानंतर आता अभिनेत्रीचा नवरा सिद्धार्थ बोडके बॉलीवूडच्या एका प्रसिद्ध अभिनेत्रीबरोबर झळकणार आहे. याचा व्हिडीओ नुकताच समोर आला आहे. अभिनेता सिद्धार्थ बोडकेने याआधी हिंदी मालिका व चित्रपटांमध्ये काम केलं आहे. या मालिका व चित्रपटांमधील त्याच्या भूमिका हिट झाल्या आहेत. आता तो बॉलीवूडच्या एका प्रसिद्ध अभिनेत्रीसह काम करताना दिसणार आहे. याचा व्हिडीओ बॉलीवूडच्या त्या अभिनेत्री सोशल मीडियावर शेअर केला असून व्हायरल झाला आहे. सिद्धार्थ काम करत असलेल्या त्या बॉलीवूडच्या प्रसिद्ध अभिनेत्रीचं नाव आहे उर्वशी रौतेला. उर्वशीसह सिद्धार्थ आगामी चित्रपटात झळकणार आहे. या चित्रपटात शिव तांडव डान्स आहे. या डान्सच्या चित्रीकरणादरम्यानचा व्हिडीओ उर्वशीने सोशल मीडियावर शेअर केले आहेत. ज्यामध्ये सिद्धार्थ एका वेगळ्या लूकमध्ये पाहायला मिळत आहे. कपाळाला भस्म, हातात भलामोठा शंख घेऊन अभिनेता दिसत आहे. अभिनेत्रीने शेअर केलेल्या या व्हिडीओला सिद्धार्थने लाइक केलं आहे.

## विवेक ओबेरॉयने मंत्र्याच्या लेकीशी केलं लग्न

बॉलीवूड अभिनेता विवेक ओबेरॉयचा ‘कंपनी’ हा पहिलाच चित्रपट बॉक्स ऑफिसवर सुपरहिट ठरला होता. यानंतर त्याने ‘साथिया’, ‘युवा’ अशा अनेक गाजलेल्या चित्रपटांमध्ये काम केलं. परंतु, या दरम्यान विवेक त्याच्या वैयक्तिक आयुष्यामुळे देखील चर्चेत आला होता. ऐश्वर्या राय आणि त्याचं अफेअर त्यानंतर झालेलं ब्रेकअप या गोष्टी चर्चेचा विषय ठरल्या होत्या. दोघांच्या ब्रेकअपची कलाविश्वात खूप चर्चा झाली होती. या प्रसंगानंतर लग्न न करण्याच्या निर्णयावर विवेक ठाम होता. त्याला अजिबात लग्न करायचं नव्हतं. ऐश्वर्यानंतर त्याने कोणत्याही मुलीशी लग्न केलं नव्हतं. अशातच त्याची ओळख प्रियांका अल्वाशी झाली आणि पुढे थोड्याच दिवसात हे दोघेही लग्नबंधनात अडकले. विवेक ओबेरॉयने नुकतीच ‘ह्युमन्स ऑफ बॉम्बे’ला मुलाखत दिली. यावेळी अभिनेत्याने जुन्या आठवणींना उजाळा देत त्याचं लग्न कसं अरेंज मॅरेज पद्धतीत जमलं? याविषयी खुलासा केला. विवेकची आई सतत लग्नाच्या मागे लागली होती. परंतु, ब्रेकअपनंतर अभिनेता लग्न करण्यास अजिबात तयार नव्हता. अशातच विवेकला त्याच्या मावशीने (आईच्या बहिणीने ) प्रियांकाचं स्थळ आणलं. तिचा फोटो पाहून आणि आईच्या हट्टापायी विवेक प्रियांकाची भेट घेण्यास तयार झाला. याशिवाय, खरंच मुलगी आवडली तर आम्ही १ वर्ष एकमेकांना समजून घेण्यासाठी डेट करू त्यानंतर लग्न करू अशी अट विवेकने त्याच्या आईला घातली होती. विवेकने प्रियांकाला भेटण्यासाठी होकार दिला तेव्हा ती इटलीला आपल्या कुटुंबीयांबरोबर सुट्टी एन्जॉय करत होती. त्यामुळे अभिनेता प्रियांकाला भेटायला इटलीला गेला.



# इंग्रजाचा तीन दिवसात खेळ खल्लास!

## अश्विनने कपिल देव यांना मागे टाकत केला खास पराक्रम

नवी दिल्ली । । वृत्तसंस्था

**शेवटच्या कसोटी सामन्याबद्दल बोलायचे झाले तर, या सामन्यात इंग्लंडचा कर्णधार बेन स्टोक्सने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. इंग्लंडचा संघ पहिल्या डावात अवघ्या 57.4 षटकात 218 धावांवर आटोपला. भारताकडून चायनामन गोलंदाज कुलदीप यादवने पहिल्या डावात पाच बळी घेतले, तर शंभरावी कसोटी खेळत असलेल्या रविचंद्रन अश्विननेही चार बळी घेतले, रवींद्र जडेजाला एक बळी मिळाला. इंग्लंडकडून जॅक क्रॉलीने सर्वाधिक 79 धावा केल्या.**



टीम इंडियाच्या पहिल्या डावात कर्णधार रोहित शर्मा आणि शुभमन गिल यांनी शानदार शतके करत केलेली 171 धावांची भागीदारी त्यानंतर सर्फराझ खान व देवदत्त पडिक्कल यांच्या अर्धशतकांच्या जोरावर 477 धावापर्यंत मजल मागली. सामन्याच्या तिसऱ्या दिवशी भारताने आठ विकेट्सवर 473 धावांवरून खेळण्यास सुरुवात केली, पण अवघ्या चार धावा करत उर्वरित दोन विकेट गमावल्या. कुलदीप यादव (30) बुमराह (20) आऊट झाले आणि टीम इंडियाने 259 धावांची मोठी आघाडी घेतली. दुसऱ्या डावात इंग्लंडची सुरुवात खूपच खराब झाली आणि दुसऱ्याच षटकात अश्विनने बेन डकेटला (2) धावसंख्येवर बाद केले. यानंतर सहाव्या षटकात 21 धावांवर जॅक क्रॉली खाते न उघडता बाद झाला आणि तोही अश्विनने घेतला. यानंतर अश्विनने 10व्या षटकात 36 धावांवर ऑली पोप (19) यालाही बाद केले. येथून जॉनी बेअरस्टोने (31 चेंडूत 39) वेगवान खेळी खेळली आणि जो रुटसोबत चौथ्या विकेटसाठी 56 धावांची भागीदारी केली, मात्र 18व्या षटकात कुलदीप यादवने बेअरस्टोला धावांवर बाद करून इंग्लंडला चौथा धक्का दिला. यानंतर, उपाहारापूर्वी, बेन स्टोक्स (2) देखील 23व्या षटकात आऊट झाला. अश्विनने पॅव्हेलियनमध्ये पाठवले.भारताचा दिग्गज फिरकीपटू रविचंद्रन अश्विनने आपल्या १००व्या कसोटीत आश्चर्यकारक कामगिरी केली. धरमशाला येथील इंग्लंडविरुद्धच्या कसोटी सामन्यात अश्विनच्या गोलंदाजीची जादू पाहायला मिळाली. पहिल्या डावात ४ बळी घेणाऱ्या या गोलंदाजाने दुसऱ्या डावात इंग्लंडचा कर्णधार बेन स्टोक्सला आपला बळी बनवले. बेन स्टोक्सचा बळी मिळवत रविचंद्रन अश्विनने ऐतिहासिक कामगिरी केली आहे. त्याचबरोबर अश्विनने भारताचे माजी कर्णधार कपिल देव यांचे दोन विक्रम मोडले आहेत. त्याचबरोबर दुसऱ्या डावात पाच विकेट्सही घेतल्या. सामन्याच्या तिसऱ्या दिवशी अश्विनने अप्रतिम गोलंदाजी केली. त्याने दुसऱ्या डावात बेन डकेट, झॅक क्रॉऊली आणि बेन स्टोक्स यांना आपले बळी बनवले. दुसऱ्या षटकाच्या पाचव्या चेंडूवर त्याने डकेटला क्लीन बोल्ड केले. यानंतर सहाव्या षटकाच्या तिसऱ्या चेंडूवर अश्विनने जॅक झॅक क्रॉऊली सर्फराझ खानकरवी झेलबाद केले. तो इथेच थांबला नाही. यानंतर त्याने इंग्लिश कर्णधारालाही आपला बळी बनवले. २३ षटकातील पाचव्या चेंडूवर बेन स्टोक्स बाद झाला. अश्विनने स्टोक्सला आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये १७दा बाद केले. आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये सर्वाधिक वेळा एकाच फलंदाजाला बाद करणारा तो गोलंदाज ठरला.

### अश्विनने ऐतिहासिक कामगिरी केली

» अश्विनने डेव्हिड वॉर्नरला ११ वेळा पॅव्हेलियनमध्ये पाठवले आहे. त्याचबरोबर वेगवान गोलंदाज इशांत शर्माने इंग्लंडचा माजी कर्णधार ॲलिस्टर कुकला ११ वेळा बाद केले आहे.टीम इंडियाच्या पहिल्या डावात कर्णधार रोहित शर्मा आणि शुभमन गिल यांनी शानदार शतके करत केलेली 171 धावांची भागीदारी त्यानंतर सर्फराझ खान व देवदत्त पडिक्कल यांच्या अर्धशतकांच्या जोरावर 477 धावापर्यंत मजल मागली. सामन्याच्या तिसऱ्या दिवशी भारताने आठ विकेट्सवर 473 धावांवरून खेळण्यास सुरुवात केली, पण अवघ्या चार धावा करत उर्वरित दोन विकेट गमावल्या. कुलदीप यादव (30) बुमराह (20) आऊट झाले आणि टीम इंडियाने 259 धावांची मोठी आघाडी घेतली.दुसऱ्या डावात इंग्लंडची सुरुवात खूपच खराब झाली आणि दुसऱ्याच षटकात अश्विनने बेन डकेटला (2) धावसंख्येवर बाद केले. यानंतर सहाव्या षटकात 21 धावांवर जॅक क्रॉली खाते न उघडता बाद झाला आणि तोही अश्विनने घेतला. यानंतर अश्विनने 10व्या षटकात 36 धावांवर ऑली पोप (19) यालाही बाद केले. येथून जॉनी बेअरस्टोने (31 चेंडूत 39) वेगवान खेळी खेळली आणि जो रुटसोबत चौथ्या विकेटसाठी 56 धावांची भागीदारी केली.

# दीप्ती शर्माची चमकदार कामगिरी करत तीन विकेट

## गोलंदाजीमुळे यूपी संघाने एका धावेने रोमहर्षक विजय

।नवी दिल्ली । प्रतिनिधी : महाईन्यूज

**यूपी वॉरियर्सची स्टार फिरकीपटू दीप्ती शर्माने दिल्ली कॅपिटल्सविरुद्ध हॅट्रिक घेत इतिहास रचला. या लीगमध्ये हॅट्रिक घेणारी दीप्ती पहिली खेळाडू ठरली आहे. दीप्तीच्या या दमदार गोलंदाजीमुळे यूपी संघाने एका धावेने रोमहर्षक विजय मिळवला. दीप्तीने या सामन्यात एकूण ४ विकेट घेतल्या.**




दीप्तीच्या चमकदार कामगिरीची सुरुवात कॅपिटल्सची कर्णधार मेग लॅनिंगला लेग-बिफोर विकेटद्वारे बाद करून झाली. १९व्या षटकात दीप्ती शर्माला गोलंदाजी करण्याची संधी मिळाली. लॅनिंगनंतर तिने अप्रतिम गोलंदाजी करत ॲनाबेल सदरलॅंड आणि अरुंधती रेड्डी यांच्या विकेट घेतल्या. दिल्ली कॅपिटल्सला यूपी वॉरियर्सकडून एका धावेने पराभूत करण्यात या विकेट्सनी महत्त्वाची भूमिका बजावली. दीप्तीने कधी हॅट्रिक घेतली हे मैदानापासून समालोचनापर्यंत कोणालाच कळले नाही.महिला प्रीमियर लीगमध्ये शुक्रवारी झालेल्या रोमांचक सामन्यात यूपी वॉरियर्सने दिल्ली कॅपिटल्सचा एका धावाने पराभव केला. दीप्ती शर्माला सामन्यातील सर्वोत्कृष्ट खेळाडू म्हणून गौरविण्यात आले, जिने ५९ धावा करत संघाची धावसंख्या १३८ पर्यंत नेली. अष्टपैलू खेळी करत दीप्तीने ४ विकेट्सही घेतल्या. दीप्ती ही महिला प्रीमियर लीगच्या इतिहासात मुंबई इंडियन्सच्या इझी वोंगनंतर हॅट्रिक घेणारी दुसरी खेळाडू ठरली. वोंगने गेल्या वर्षी एलिमिनेटरमध्ये वॉरियर्सविरुद्ध ही कामगिरी केली होती. विशेष म्हणजे त्या हॅट्रिक विकेटमध्ये दीप्तीचाही सहभाग होता. दीप्ती शर्मा ही गोलंदाजीसोबतच एक शानदार फलंदाजही आहे. दीप्तीला दिल्लीविरुद्धच्या सामन्याच तिसऱ्या क्रमांकावर फलंदाजीला धाडले. फलंदाजीत यूपीचे इतर फलंदाज विशेष काही करू शकले नाहीत, पण दुसऱ्या टोकाला दीप्ती शर्माने आघाडी कायम ठेवली.

### हॅटट्रिक घेत इतिहास रचला

» तिने ४८ चेंडूत १ षटकार आणि ६ चौकारांच्या मदतीने ५९ धावा केल्या. वॉरियर्सने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना ८ गडी गमावून १३८ धावा केल्या. प्रत्युत्तरात दिल्लीचा संघ १९.५ षटकांत १३७ धावांवर आटोपला. तिसऱ्या क्रमांकावर खेळणाऱ्या दीप्ती शर्मानेही फलंदाजी करताना अर्धशतक झळकावले. यूपी वॉरियर्सला आतापर्यंत या स्पर्धेत खूप संघर्ष करावा लागला आहे. दिल्लीविरुद्धच्या विजयापूर्वी, यूपी संघाने ६ सामने खेळले होते, परंतु केवळ दोन सामन्यांमध्ये त्यांना विजय मिळवण्यात यश आले होते. अशा स्थितीत दिल्लीविरुद्धचा विजय यूपीसाठी खूप महत्त्वाचा ठरला आहे.यूपी वॉरियर्सची स्टार फिरकीपटू दीप्ती शर्माने दिल्ली कॅपिटल्सविरुद्ध हॅटट्रिक घेत इतिहास रचला.